# निशाणी ०५ खाली आदेश

कौंटुबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा २००५ च्या कलम २३ नुसार अंतरीम पोटगी मिळणेकरीता दाखल केला आहे

**<u>अर्जातील थोडक्यात कथने पुढील प्रमाणे</u> –**

२. अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ यांचा विवाह दि.०९/०९/२०२२ रोजी हिंदू धर्म शास्त्र रिवाजाप्रमाणे वाठार स्टेशन येथील महाकाली मंदीरामध्ये अत्यंत साध्या पध्दतीने झाला असून विवाह झालेनंतर अर्जदार नं.१ गैरअर्जदार नं.१ यांचेसोबत सासरी नांदावयास गेली, सासरी राहात असताना सर्व गैरअर्जदार यांनी अर्जदाराचा गर्भपात करावा, तसेच बांधकाम व्यावसाय व वाढीसाठी आई वडिलांकडून र.रु.१०,००,०००/– आणावेत यासाठी अर्जदार नं.१ हिचा मानसीक व शारीरीक छळ केला व अर्जदार नं.१ हिस वर नमूद कारणावरुन भांडण तंटा करुन लग्नानंतर काही महिण्याच्या कालावधीतच अंगावरच्या कपडयानिशी घराबाहेर हाकलून दिले.

३. अर्जदाराच्या कथनानुसार, गैरअर्जदार नं.१ याने लग्नापूर्वी अर्जदार नं.१ अज्ञान असताना तिच्याशी जबरदस्तीने शरीरसंबंध ठेवले व त्यातून अर्जदार नं.२ हिचा जन्म झाला व सा.वाला नं.१ सदरची बाब मान्य करीत नाही. अर्जदार नं.१ च्या चारित्र्यावर संशय घेवून अर्जदार नं.१ व २ यांना सांभाळण्यास नकार देत आहे. तसेच पुणे येथील खाजगी प्रयोगशाळेमध्ये अर्जदार नं.२ व सा.वाला नं.१ यांची

डी एन ए चाचणी करुन घेवून त्याचा अहवाल निगेटीव्ह आला  याचा कांगावा करुन या अर्जदार नं.१ हिच्या चारित्र्यावर शिंतोडे उडवून तिची गावामध्ये, समाजामध्ये बदनामी करीत आहे. सा.वाला नं.१ हा अर्जदार नं.२ हिचे पितृत्व नाकारत असल्यामुळे व अर्जदार नं.१ हिस घराबाहेर हाकलून दिल्यामुळे अर्जदार नं.१ मुलीसह गेली १० महिण्यांपासून तिचे आई वडीलांसोबत माहेरी राहत आहे. तेव्हा पासून गैरअर्जदार नं.१ ने अर्जदारांचे उदरनिर्वाहाची कोणतीही व्यवस्था केलेली नाही. अर्जदार नं.१ हिस स्वतःचे उदरनिर्वाहाचे साधन उपलब्ध नसल्यामुळे तिच्या आई वडीलांची आर्थिक परीस्थीती बेताची असल्यामुळे अर्जदार क्र.१ व २ वर उपाशीपोटी राहण्याची वेळ आली आहे. याउलट गैरअर्जदार नं.१ याची आर्थिक परीस्थीती चांगली असून त्यास र.रु.५०,०००/– दरमहा बांधकाम व्यवसायातून उत्पन्न् मिळते व र.रु.५,००,०००/– वार्षिक् उत्पन्न् शेतीतून मिळते. तसेच सा.वालानं.३ यांना २ शासकीय सेवानिवृत्ती वेतन मिळतात. गैरअर्जदार याचे उत्पन्नावर अर्जदारां व्यतीरीक्त अन्य कोणीही अवलंबून नाही. त्यामुळे प्रस्तुत अर्जाचा अंतिम निकाल लागेपर्यंत गैरअर्जदार क्र. १ याचे कडून दर महा रुपये २० हजार पोटगी मिळावी म्हणुन प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

४. गैरअर्जदार क्र. १ ते ५ यांनी निशाणी ८ वर सदर अर्जास त्यांचे म्हणणे दाखल केले आहे. अर्जदाराच्या अर्जातील अर्जदार नं.१ व गैरअर्जदार नं.१ यांचा विवाह मौजे वाठार स्टेशन येथील महाकाली मंदिरामध्ये झालेला आहे. एवढाच मजकूर मान्य व कबूल केला असून इतर सर्व कथने नाकारली आहेत. त्यांच्या म्हणण्यानुसार,  अर्जदाराचा गैरअर्जदार क्र. १ ते ५ यांनी कधीही छळ केला नव्हता तसेच तिला मारहाण करुन कधीही घराबाहेर काढले नव्हते.

५. गैरअर्जदार पुढे कथन करतात की, अर्जदार नं.१ व गैरअर्जदार हे

एकमेकांचे शेजारी राहत होते व आहेत. अर्जदार ही शिक्षणाबरोबर किर्तनाचा अभ्यास करीत होती. तसेच अर्जदार ही वारीलासुध्दा जात होती, त्यामुळे गैरअर्जदार व त्यांच्या आईवडिलांना अर्जदार ही अत्यंत सुसंस्कारी मुलगी आहे असा गोड गैरसमज होवून गैरअर्जदार व  त्यांचे कुटूंबिय व अर्जदार व त्यांच्या कुटूंबामध्ये चर्चा होवून कोणत्याही देण्या–घेण्या शिवाय साधेपणाने अर्जदार क्र.१ व गैरअर्जदार नं.१ यांचाविवाह दि.०९/०९/२०२२ रोजी वाठार स्टेशन येथील महाकाली मंदीरामध्ये पार पडला. सदर विवाहानंतर अर्जदार नं.१ ही गैरअर्जदार यांच्यावकडे नांदावयास आली असता, अर्जदार नं.१ हिचे शारीरीक परीस्थीतीची गैरअर्जदार यांच्या कुटूंबियास शंका आलेने, गैरअर्जदार यांच्या कुटूंबियांनी अर्जदार नं.१ हिच्याकडे चौकशी केली असता अर्जदार नं.१ हिच्या आईच्या व चुलत्याच्या सांगण्यावरुन अर्जदार नं.१ हि ''मी गरोदर आहे व पोटातील बाळ हे गैरअर्जदारनं.१ याचे आहे'' असे सांगू लागली.

६. गैरअर्जदार यांच्या कथनानुसार गैरअर्जदार नं.१ व अर्जदार हीचेमध्ये कधीही शारीरीक संबंध आलेले नाहीत, त्यामुळे गैरअर्जदार नं.१ यांचेपासून अर्जदार नं.१ ही गर्भवती होणेचा प्रश्नच उदभवत नाही असे अर्जदार हिच्या कुटूंबियासमोर स्पष्टपणे सांगून अर्जदार नं.१ हीस तिचे आईचे डोक्यावर हात ठेवून शपथ घेणेस सांगीतले असता, अर्जदार नं.१ व तिच्या आईने व अर्जदार नं.१ चे चुलते विजय ढाणे याने अर्जदार हिचे पितळ उघडे पडू नये म्हणून प्रचंड दंगा, आरडाओरडा, शिवीगाळ करुन, शपथ न घेताच अर्जदार नं.१ हिस घेवून तिच्या माहेरी निघून जाताना गैरअर्जदार नं.१ व त्यांच्या कुटूंबियांना जेलमध्ये टाकणेची धमकी दिलेली होती व आहे. अर्जदार नं.१ ही विवाहापूर्वी अन्य इसमाकडून गर्भवती राहीली आहे. तिने दिनांक १३/०२/२०२३ रोजी मुलीला जन्म दिला आहे. उभयतांचे कुटूंबियांचे चर्चेनुसार सहयाद्री स्पेशॅलिटी लॅब येथे गैरअर्जदार नं.१ तसेच अर्जदार

नं.१ यांचे अपत्याची डी एन ए चाचणी करण्यात आली. तथापि चाचणीच्या अहवालानुसार गैरअर्जदार हे सदरील अपत्याचा जैविक पिता नाही हे सिध्द झाले. विवाहापूर्वी व विवाहानंतर अर्जदार नं.१ ही गर्भवती असल्याचे निर्दशणास आलेनंतर त्या क्षणापासून अर्जदार नं.१ व गैरअर्जदार नं.१ हे एकत्र नांदले नाहीत व त्यांचेत शारीरीक संबंध आलेले नाहीत. अर्जदार नं.१ हिचे गर्भारपणाबाबत गैरअर्जदार यास विवाह करतेवेळी कोणतेही ज्ञान व माहिती नव्हती. सदर बाब जाणीवपूर्वक लपवून ठेवून अर्जदार व तिच्या कुटूंबियांनी गैरअर्जदार नं.१ याचे लग्न लावून देवून गैरअर्जदार नं.१ व त्याचे कुटूंबियांची घोर फसवणूक व विश्वासघात केलेला आहे. करीता अर्जदाराचा अर्ज खर्चासह नामंजूर करावा अशी विनंती केली आहे.

७. अर्जदार व गैरअर्जदाराच्या विधिज्ञांचा विस्तृत युक्तीवाद ऐकला.

८. अर्जदाराचे कथन, दाखल पुरावा व कागदपत्रे यावरुन पुढील विचाराधिन मुद्दे उपस्थित झाले असुन त्यावरील माझे निष्कर्ष मी कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदवले आहे.

| **अ.नु. क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अर्जदार ही कौटूंबिक हिंसाचाराचा बळी असल्याचे सिध्द करते काय ? | होकारार्थी |
| २. | अर्जदार ही मागणीप्रमाणे गैरअर्जदार क्र. १ याचेकडून अंतरीम पोटगी रुपये अर्जदार नं.१ व २ साठी प्रत्येकी १०,०००/– मिळणेस पात्र आहे काय ? | अंशतः होकारार्थी<br>गैरअर्जदार क्र. १ याचे कडून प्रत्येकी रुपये ५,०००/– अर्ज दाखल तारखेपासून प्रस्तुत |

अर्जाचा अंतिम निकाल लागेपर्यंत

३. आदेश काय ? अंतिम आदेशाप्रमाणे

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १ बाबत** –

९. प्रस्तुत प्रकरणामध्ये पक्षकारांचे नातेसंबंध विवादीत नाहीत. अर्जदाराच्या कथनानूसार तिचा गैरअर्जदार क्र.१ याच्यासोबत दि.०९/०९/२०२२ रोजी हिंदू धर्म शास्त्र रिवाजाप्रमाणे वाठार स्टेशन येथील महाकाली मंदीरामध्ये विवाह झाला आहे. सदरची बाब ही गैरअर्जदार यांनी मान्य केली आहे. गैरअर्जदार याने अर्जदारास गर्भपात करावा म्हणून अनेक दवाखाण्यात नेले, तसेच बांधकाम व्यावसाय वाढीसाठी तिच्या आई वडिलांकडून र.रु.१०,००,०००/– आणावेत यासाठी अर्जदार नं.१ हिचा मानसीक व शारीरीक छळ केला याच कारणावरुन भांडण तंटा करुन लग्नानंतर काही महिण्याच्या कालावधीतच अंगावरच्या कपडयानिशी अर्जदारास घराबाहेर हाकलून दिले या बाबी अमान्य केल्या आहेत. गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदार क्र.२ हिचे पितृत्व नाकारीत असून त्याचे कथनानुसार तो अर्जदार क्र.२ चा जैविक पिता नाही. गैरअर्जदार हा अर्जदार क्र.२ चा पिता आहे किंवा नाही या बाबी सबळ पुराव्यावरुन ठरणार आहेत. मात्र सबळ पुराव्याअभावी अर्जदार क्र.१ च्या चारित्र्यावर संशय घेणे हा देखील हिंसाचार आहे असे दिसून येते. प्रस्तूत अर्जाचा विचार करीत असताना प्रथमदर्शणी पुराव्यानुसार (अर्जदार क्र.२ च्या जन्माचा दाखला) गैरअर्जदार हा अर्जदाराचा पिता असल्याचे दिसून येते.

१०.     अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अर्जदाराने नि.क्र.३ सोबत काही कागदपत्रे दाखल केली आहेत. अ.क्र.१ वर अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ याच्या विवाहाची लग्न पत्रीका दाखल केली आहे. अ.क्र.२ वर लग्नाचे दोन फोटो दाखल केले आहेत. अ.क्र.३ वर लग्नाची पावती दाखल केली आहे. अ.क्र.४ वर महाकाली मंदीरातील विवाह नोंदणी रजिस्टरची विवाह नोंद दाखल केली आहे. अ.क्र.५ वर जिल्हा रुग्नालय सातारा येथील १६/०२/२०२३ चे डिस्चार्ज कार्ड दाखल केले आहे. अ.क्र.६ वर अर्जदार राधिका हिच्या जन्माचा दाखला दाखल केला आहे. त्यावरुन अर्जदाराची जन्मतारीख ०८/०९/२००४ असल्याचे दिसून येते. अ.क्र.७ वर अर्जदार क्र.२ वृंदा रविराज बर्गे हिच्या जन्माचे प्रमाणपत्र दाखल केले आहे. त्यावरुन अर्जदार क्र.२ हिचा जन्म १३/०२/२०२३ रोजी झाल्याचे दिसून येते. त्यावर अर्जदार क्र.२ हिचे नाव वृंदा रविराज बर्गे असे दिसून येते. अ.क्र.८ ते १० वर अर्जदाराच्या वतीने गैरअर्जदार क्र.१ यास वकिलामार्फत पाठवलेली नोटीस, तिच्या आर पी ए डी च्या पावत्या व पोहोच पावत्या दाखल केल्या आहेत. अ.क्र.११ वर राधिका रविराज बर्गे रविराज बर्गे याचे विरुध्द भा.द.वि.कलम ३७६(२)(एन), ४९८अ, तसेच पोस्को कायदयानुसार दाखल केलेली एफ. आय. आर. क्र. ३०७/२०२३ ची प्रत दाखल केली आहे. यावरुन अर्जदाराने गैरअर्जदाराविरुध्द पोस्को व आय. पी. सी. कायदयाखाली केस केल्याचे दिसून येते.

११.     अभिलेखावरील अर्जदाराचा अर्ज त्यासोबतचे शपथपत्र व अभिलेखावरील दाखल कागदपत्रांच्या अवलोकनावरुन अर्जदार क्र.१ हिच्यावर कौटूंबिक हिंसाचाराच्या कक्षेत बसू शकतील असे अत्याचार गैरअर्जदार क्र.१ याच्याकडून झाल्याचे दिसून येत आहे. गैरअर्जदार क.२ हिचे पालकत्व नाकारुन, तिच्या चारित्र्यावर संशय घेवून, गर्भपातासाठी तिच्यावर दबाव आणून, तिची

बदनामी करुन, अर्जदारांच्या पालनपोषणाची कोणतीही जबाबदारी न घेवून, त्यांना परावलंबी जीवन जगण्यास भाग पाडून गैरअर्जदार अर्जदारावर मानसीक, शारिरीक व आर्थिक अत्याचार करीत असल्याचे दिसून येत असल्याने, तसेच आजरोजी अर्जदार क्र.१ ही अर्जदार क्र.२ सोबत तिच्या माहेरी आई वडिलांकडे राहत असल्याचे दिसून येत आहे. या वरुन अर्जदाराला प्रथमदर्शनी कौटूंबिक हिंसाचाराचा सामना करावा लागला आहे ही बाब प्रथमदर्शनी पुराव्यावरुन शाबीत होत आहे असे दिसून येते. त्यामुळे मी मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदविते.

**<u>मुद्दा क्र. २ करीता –</u>**

१२. मुद्दा क्र. १ चे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अर्जदाराने दाखल केलेल्या कागदपत्रावरुन प्रथमदर्शनी अर्जदार क्र.१ ला कौटुंबिक हिंसाचाराचा सामना करावा लागला ही बाब सिध्द केली असल्यामुळे ती बारावी मध्ये शिक्षण घेत असल्याने ती स्वतःचे व अर्जदार क्र.२ चा उदरनिर्वाह करणेस असमर्थ असल्याचे दिसून येते. अर्जदाराला उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही ती तिच्या आई वडिलांच्या दयेवर अवलंबून असून ती अर्जदार क्र.२ सह आश्रीताचे जिवन जगत असल्याचे दिसून येत आहे. अर्जदार क्र.१ व २ स्वतंत्र राहत असल्यापासून गैरअर्जदार क्र. १ याने त्यांच्या उपजिवीकेची कोणतीही सोय केलेली नाही. तिला आर्थिक मदतीचा हातभार लावलेला नाही.

१३. अभिलेखावरील नि.क्र.९ वर अर्जदाराचे मालमत्ता व दायित्वा बाबतचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. त्यानुसार अर्जदार क्र.१ शिक्षण घेत असल्याचे दिसून येते. याशिवाय अर्जदाराने नि.क्र.११ सोबतच्या कागदपत्रांच्या यादी नुसार अ.क्र.१ वर गैरअर्जदार क्र.१ याचा मौजे सुलतानवाडी येथील गट क्र.१८/१/ब चा ७/१२ उतारा दाखल केला आहे. त्याचे अवलोकनावरुन गैरअर्जदार क्र.१ च्या नावे

०.५१ आर क्षेत्र असल्याचे दिसून येते. अ.क्र.२ वर गैरअर्जदार क्र.२ याचा मौजे सुलतानवाडी येथील गट क्र.१७/४ चा ७/१२ उतारा दाखल केला आहे. त्याचे अवलोकनावरुन गैरअर्जदार क्र.२ च्या नावे ०.१०.५० आर क्षेत्र असल्याचे दिसून येते. अ.क्र.३ वर गैरअर्जदार क्र.२ याचा मौजे सुलतानवाडी येथील गट क्र.१८/२ चा ७/१२ उतारा दाखल केला आहे. त्याचे अवलोकनावरुन गैरअर्जदार क्र.२ व मोहन आणि शांताबाई यांचे नावे समाईकातील ०.३३.२५ आर क्षेत्र असल्याचे दिसून येते. अ.क्र.४ वर गैरअर्जदार क्र.२ याचा मौजे सुलतानवाडी येथील गट क्र.१९/२ चा ७/१२ उतारा दाखल केला आहे. त्याचे अवलोकनावरुन गैरअर्जदार क्र.२ व मोहन आणि शांताबाई यांच्या नावे समाईकातील ०.१५.७५ आर क्षेत्र असल्याचे दिसून येते. अ.क्र.५ वर गैरअर्जदार क्र.२ याचा मौजे सुलतानवाडी येथील गट क्र.२०/२ड चा ७/१२ उतारा दाखल केला आहे. त्याचे अवलोकनावरुन गैरअर्जदार क्र.२ व मोहन आणि शांताबाई यांच्या नावे समाईकातील ०.२६.७५ आर क्षेत्र असल्याचे दिसून येते. अ.क्र.६ वर गैरअर्जदार क्र.२ याचा मौजे सुलतानवाडी येथील गट क्र.५७/२ चा ७/१२ उतारा दाखल केला आहे. त्याचे अवलोकनावरुन गैरअर्जदार क्र.२ व मोहन आणि शांताबाई यांच्या नावे समाईकातील ०.१०.२५ आर क्षेत्र असल्याचे दिसून येते. अ.क्र.७ वर गैरअर्जदार क्र.२ याचा मौजे सुलतानवाडी येथील गट क्र.५९/२ चा ७/१२ उतारा दाखल केला आहे. त्याचे अवलोकनावरुन गैरअर्जदार क्र.२ व मोहन आणि शांताबाई यांच्या नावे समाईकातील ०.०८.७५ आर क्षेत्र असल्याचे दिसून येते. अ.क्र.८ वर गैरअर्जदार क्र.२ याचा मौजे सुलतानवाडी येथील गट क्र.१६/२/ब चा ७/१२ उतारा दाखल केला आहे. त्याचे अवलोकनावरुन गैरअर्जदार क्र.२ याच्या नावे ०.२०.०० आर क्षेत्र असल्याचे दिसून येते.

१४. वरील सर्व कागदपत्रावरुन गैरअर्जदार क्र.१ ते ३ यांना शेती असून,

त्यातील काही शेती गैरअर्जदार क्र.१ याच्या नावे असून त्याना शेतीमधून उत्पन्न् मिळते असे प्रथमदर्शणी दिसून येते. गैरअर्जदारातर्फे नि.क्र.१२ वर कागदपत्रे दाखल करुन नि.क्र.१३ वर रविराज युवराज बर्गे याचे मालमत्ता व दायित्वा बाबतचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. त्यावरुन सातारा येथे एच. एम. पी. क्र.२११/२०२३ मध्ये अर्जदाराने हिंदू विवाह कायदयानुसार पोटगी अर्ज दाखल केला असे दिसून येते. मात्र पोटगी आदेश अदयाप झालेला नाही. गैरअर्जदार क्र.२ यास पेंन्शन भेटत असल्याचे दिसते. यावरुन गैरअर्जदार क्र.२ व ३ हे गैरअर्जदार क्र.१ वर अवलंबून असल्याचे दिसून येत नाही. गैरअर्जदार क्र.१ याने त्याचे मासिक उत्पन्नातून र.रु.१५,०००/– दाखविले आहे.

१५. अर्जदाराने गैरअर्जदार क्र.१ याचे उत्पन्नाचा पुरावा अभिलेखावर दाखल केलेला असून अर्जदारांच्या उपजिवीकेची संपुर्ण जबाबदारी ही गैरअर्जदार क्र. १ याचीच असल्यामुळे गैरअर्जदाराच्या राहणीमानाच्या दर्जाप्रमाणे अर्जदारांच्या उपजिवीकेची सोय करणे हे गैरअर्जदार क्र. १ याचे कर्तव्य आहे. अर्जदाराच्या उपजिविकेची जबाबदारी ही गैरअर्जदार क्र. १ चीच असल्यामुळे अर्जदाराच्या उदरनिर्वाहासाठी, औषधोपचारासाठी व रोजच्या दैनंदिन गरजा भागवण्यासाठी सध्याच्या महागाईचा विचार करुन अर्जदार क्र.१ व २ या गैरअर्जदार क्र. १ कडून दरमहा प्रत्येकी रुपये ५,०००/– अंतरिम पोटगी म्हणून प्रस्तुतचा अर्ज दाखल तारखेपासून मिळणेस पात्र आहे. सबब मी मुद्दा क्र. २ बाबत वरील प्रमाणे निष्कर्ष नोंदवीत आहे तसेच मुद्दा क्र. ३ बाबत खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज अंशतः मंजुर करण्यांत येतो.

२. गैरअर्जदार क्र. १ ने अर्जदार क्र.१ हिस प्रतिमहिना र.रु. ५,०००/– व अर्जदार क्र.२ हिस प्रतिमहिना ५,०००/– रुपये (प्रत्येकी पाच हजार रुपये) अंतरिम पोटगी म्हणून अर्ज केले पासून मुळ अर्जाचा अंतिम निकाल लागेपर्यंत द्यावी.

३. सदर आदेशाची प्रत विनाशुल्क दोन्ही पक्षांना द्यावे.

**(खुले न्यायालयात घोषीत)**

UMA KAKASAHEB GANGANE

Digitally signed by UMA KAKASAHEB GANGANE
Date: 2024.10.24 16:42:07 +0530

दिनांक – २४.१०.२०२४ (श्रीमती यु. ए. भोसले)

ठिकाण – कोरेगाव. २ रे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कोरेगाव